**प्रेसनोट दिनांक १७/०७/२०१९**

**मार्केटयार्ड पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**शाळेमध्ये जावुन शाळेतील मुली व मुले यांना मार्गदर्शन केले बाबत.**

---

मार्केटयार्ड पोलीस स्टेशनच्या हद्दिमध्ये आज दि.१७/०७/२०१९ रोजी कष्टकरी हमालपंचायत शाळेमध्ये जावुन मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो श्री निंबाळकर यांनी शाळेचे मुख्याध्यापक,शिक्षक व शाळेतील मुली व मुलांची भेट घेतली.सदर भेटीदरम्यान व.पो.नि. सो यांनी मुख्याध्यापक व शिक्षकांना पोलीसांकडुन काय अपेक्षा आहेत याबाबत विचाराणा केली व इयत्ता ७ वी च्या वर्गामध्ये जावुन विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्याबाबत मार्गदर्शन केले.मुलींनी कोणताही अत्याचार सहन न करता तात्काळ शिक्षकांना किंवा पोलीसांना संपर्क करण्याबाबत सांगितले.पोलीस हे तुमचे मित्र आहेत त्यांना न घाबरता आपण आपल्या समस्या पोलीसांकडे मांडाव्यात याबाबत माहिती दिली.शाळेतील मुख्याध्यापक,शिक्षक मुली व मुले यांनी पोलीसांच्या कार्यपद्धती पाहण्यासाठी मार्केटयार्ड पोलीस स्टेशनला भेट द्यावे अशी व.पो.नि. सो मार्केटयार्ड पो.स्टे. यांनी सर्वांना विनंती केली.

